म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का. गा.
दा. क्र. ६२६९



IRBK-0106269
IRBK-0106269

# वधूपरीक्षा

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

वि. सी. गुर्जर

# नाटकांच्या गोष्टी : ५

# वधूपरीक्षा

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ह्यांच्या
'वधूपरीक्षा' नाटकाची गोष्ट

विठ्ठल सीताराम गुर्जर

स. ठाणे वाचनालय शाखा
IRBK-0106269

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य आठ आणे

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

पहिली आवृत्ति : १९५७

मुद्रक :
श्रीनिकेतन ढवळे,
कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक :
केशव भिकाजी ढवळे,
कर्नाटक हाउस, चिराबाजार, मुंबई २

२९७०
बालवा
७६८

# नान्दी

मराठी रंगभूमीचा उदयकाल सामान्यतः सन १८४३ हा धरला जातो. परंतु तिच्या उत्कर्षकालाला आरंभ सन १८८० मध्यें झाला. ह्या वर्षीं आद्य संगीत नाटककार कै. अण्णासाहेब किर्लोस्कर ह्यांनीं स्थापन केलेल्या सुप्रसिद्ध किर्लोस्कर नाटक मंडळीनें संगीत शाकुंतल नाटकाचा प्रथम प्रयोग पुण्यास आनंदोद्भव नाटकगृहांत ता. ३१ ऑक्टोबर रोजीं केला आणि तेव्हांपासून मराठी रंगभूमीला पूर्ण अभिजातता आणि अपूर्व तेज चढलें ! मराठी रंगभूमीला तेव्हांपासून बंदिस्त आधुनिक स्वरूप आलें, असें म्हणावयाला हरकत नाहीं. ह्या उत्कर्षकालांतील प्रभावशाली नाटककारांमध्यें, कै. अण्णासाहेब किर्लोस्कर, कै. गोविंदराव देवल, कै. तात्यासाहेब कोल्हटकर, कै. काकासाहेब खाडिलकर आणि कै. राम गणेश गडकरी ह्यांची प्रामुख्यानें गणना होते. हे सर्वही नाटककार आपापल्या परी अत्यंत नामांकित, विलक्षण प्रतिभाशाली, प्रथम श्रेणीचे असून, त्यांच्या सर्वसुंदर नाटकांमुळें मराठी रंगभूमीपुढील अर्धशतक अपूर्व तेजानें तळपत राहिली आणि ह्या भारतवर्षांतील बहुविध भाषांच्या रंगभूमींमध्यें अग्रगण्य ठरून अजूनही तें सर्वश्रेष्ठ पद तिच्याकडेच कायम राहिलें आहे.


अण्णासाहेब किर्लोस्कर


देवल


रा. ग. गडकरी

ह्या पहिल्या दर्ज्याच्या नाटककारांपैकीं श्री. श्रीपाद कृष्ण ऊर्फ तात्यासाहेब कोल्हटकर ह्यांनीं लिहिलेल्या नाटकांपैकीं सहावें नाटक 'वधूपरीक्षा' ह्याची गोष्ट ह्या 'नाटकांच्या गोष्टीं' च्या कथामालेंतील कथेंत सांगितली आहे.

'वधूपरीक्षा' हें गद्य नाटक कोल्हटकरांनीं सन १९१२ मध्यें लिहिलें. त्यांचें हें पहिलेंच गद्य नाटक. वास्तविक ह्या नाटकाचा विषय संगीत स्वरूपालाच अधिक योग्य असा होता. परंतु नियति अशी, कीं तें नाटक गद्यरूपानेंच प्रथम रंगभूमीवर अवतरलें. कै. कोल्हटकर हे एक फार उच्च श्रेणीचे कवि असून त्यांची मनःप्रवृत्तिच काव्यमय आणि कल्पनाकाशांत अनिबध विहार करणारी होती. त्याप्रमाणेंच तात्यासाहेब हे, बारीक आवाजानें का होईना, सुंदर गात असत; त्यामुळें त्यांची नैसर्गिक प्रवृत्ति संगीत नाटक लिहिण्याकडेच विशेष असे. परंतु 'वधूपरीक्षा' हें नाटक रंगभूमीवर येतांना त्यांच्या ह्या संगीत प्रवृत्तीला वाव मिळाला नाहीं.

'वधूपरीक्षा' हें नाटक ज्या कालीं रंगभूमीवर आलें, त्या कालीं महाराष्ट्रांत नाट्य-प्रयोग करणाऱ्या ८–१० चांगल्यापैकीं नाटक मंडळ्याच होत्या. त्यांपैकीं संगीत नाटकें करणाऱ्या मंडळ्यांमध्यें ज्याप्रमाणें 'किर्लोस्कर नाटक मंडळी' अग्रेसर होती, त्याप्रमाणें गद्य नाटकें करणाऱ्या तुरळक ३–४ मंडळ्यांत, 'महाराष्ट्र नाटक मंडळी' ही प्रमुख होती. ही मंडळी मुख्यतः काकासाहेब खाडिलकर ह्यांचींच नाटकें करीत असे. ही नाटकमंडळी इतकी गुणी होती, कीं तिचीं नाटकें किर्लोस्कर मंडळीच्या संगीत नाटकांइतकींच लोकप्रिय असत. पुढें कालांतरानें महाराष्ट्र मंडळीला दुहीचा 'महाराष्ट्रीय' शाप बाधला आणि एकापेक्षां एक गुणवान् पात्रें असलेली ती मंडळी फुटून त्यांपैकीं बऱ्याचशा प्रमुख नटांची 'भारत नाटक मंडळी' तयार होऊन तिनेंही गद्य नाटकेंच करावयाची तयारी सुरू केली. महाराष्ट्र मंडळीचे अत्यंत लोकप्रिय प्रतिभाशाली नाटककार श्री. काकासाहेब खाडिलकर ह्यांचीं नाटकें ह्या नव्या मंडळीला मिळणें शक्यच नव्हतें. तेव्हां भारत मंडळीचे मालक व चालक



कृ. प्र. खाडिलकर



न. चिं. केळकर



यशवंतराव टिपणीस



बाप्पा ठक्कर

श्री. अप्पा टिपणीस ह्यांनीं स्वतः कंबर कसून नवीं नाटकें लिहून रंगभूमीवर आणण्याची सिद्धता दर्शविली आणि इतर नामांकित नाटक्कारांकडून मुद्दाम नाटकें लिहवून घेऊन तीं रंगभूमीवर आणावयाचे प्रयत्न सुरू केले. ह्या 'नव्या' नाटक्कारांत कै. श्री० नरसिंह चिंतामण केळकर हे एक असून त्यांचें 'तोतयाचें बंड' हें नवेंच ऐतिहासिक नाटक भारत मंडळीनें ताबडतोब रंगभूमीवर आणलें. त्याप्रमाणेंच श्री. तात्यासाहेब कोल्हटकर ह्यांच्या मागें टिपणीसांनीं नवें गद्य नाटक भारत मंडळीकरतां लिहून द्यावयाला निकड लावली. अर्थात्च तात्यासाहेबांनाही असा उत्कृष्ट नटसंच असलेल्या ह्या नाटकमंडळीच्या रंगभूमीवर – ती मग गद्य का असेना – आपलें नाटक आणण्याचा मोह आवरला नाहीं, ह्यांत नवल नाहीं!

त्यांनीं ही कामगिरी मोठ्या आनंदानें आणि हौसेनें अंगावर घेतली आणि १९१२ सालच्या नाताळच्या सुटींत वार्षिक रिवाजाप्रमाणें ते मुंबईला आले असतां, अवघ्या ८–१० दिवसांत त्यांनीं 'वधूपरीक्षा' हें नाटक लिहूनही काढलें. ह्या ऐकान्तिक नाट्यलेखनासाठीं तात्यासाहेबांनीं आपणांला कै. बाप्पा ठक्करांसारख्या परकी, अमहाराष्ट्रीय गृहस्थांच्या बिऱ्हाडीं एकान्तांत 'कोंडून' घेतलें आणि नाटक लिहून पुरें होईपर्यंत आपल्या निकटच्या परिचित मंडळींचीही त्यांनीं गांठ घेतली नाहीं. हे दहा दिवस तात्यासाहेबांनीं नुसते पाव-कॉफी ह्या अन्नावर काढले.



त्र्यंबकराव प्रधान

संन १९१३ मध्यें अप्पा टिपणीसांनीं 'वधूपरीक्षा' नाटक रंगभूमीवर आणलें. त्याचे प्रयोग अतिशय सुंदर होत. विशेषतः, अप्पांचें धुरंधराचें, श्री. चिंतामणराव कोल्हटकरांचें भार्गवाचें, श्री. त्र्यंबकराव प्रधानांचें पार्थिवाचें, श्री. रानडे ह्यांचें खंडेराव कोतवालाचें आणि श्री. पोतनिसांचें त्रिवेणीचें, हीं कामें खरोखर अगदीं दृष्ट लागण्याजोगीं होत.

आपलें नाटक गद्यांत रंगभूमीवर यावें, ह्याची कोल्हटकरांच्या सौंदर्यलोलुप मनाला थोडी रुखरुख लागून राहिली असावी. ती कालान्तरानें नाहींशी व्हावी असाच दैवयोग होता, असें म्हटलें पाहिजे. सुप्रसिद्ध ललितकलादर्श नाटक मंडळीचे मालक सुविख्यात गायक नट कै. श्री. बापूसाहेब पेंढारकर ह्यांनीं मुंबईतच मोठे मुक्काम करायची प्रथा अमलांत आणायला जेव्हां सुरुवात केली, त्या वेळीं उत्पन्नाचा आंकडा उणा पडूं नये म्हणून नवींनवीं नाटकें रंगभूमीवर आणायची त्यांना फार जरूरी भासूं लागली. त्या वेळीं अजिबात नवीन नाटकें सारखीं हातीं येणें शक्य नसल्यामुळें संगीत प्रयोगाला योग्य अशा जुन्या लोकप्रिय गद्य नाटकांना संगीत पेहराव चढविण्याचा पेंढारकरांनीं उपक्रम सुरू केला. त्यांत 'वधूपरीक्षा' नाटकाला पदांची जोड देण्याची कल्पना बापूसाहेबांच्या मनांत आली आणि ती त्यांनीं तात्यासाहेबांपाशीं प्रगट केली. तात्यासाहेब अर्थातच मोठ्या उत्साहानें त्यांच्या प्रस्तावाला तयार झाले आणि प्रख्यात गायक कै. वझेबुवा ह्यांच्या सुंदर चालींच्या साहाय्यानें 'वधूपरीक्षे'ला उत्कृष्ट संगीत रूप देण्यांत येऊन स. १९२८ मध्यें तें मुंबईंत संगीत नाटक म्हणून गाजूंही लागलें. संगीत वधूपरीक्षा नाटकांत खुद्द बापूसाहेबांची धुरंधराची व कै. श्री. माशेलकरांची त्रिवेणीची ह्या भूमिका फारच नांवाजण्यायोग्य होत असत. बापूसाहेबांच्या धोरणी कल्पनेप्रमाणें 'वधूपरीक्षे' चें संगीत स्वरूप चांगलेंच लोकप्रिय झालें; कारण कोल्हटकरांच्या सर्व नाटकांत 'वधूपरीक्षा' नाटकामध्यें खचून नाट्य असून संगीतालाही उत्कृष्ट वाव होता.

वि. सी. गुर्जर

# श्रीपाद कृष्ण कोल्हटकर



आधुनिक मराठी नाटककारांत अग्रगण्य असलेले श्रीपाद कृष्ण ऊर्फ तात्यासाहेब कोल्हटकर ह्यांचा जन्म ता. २९ जून १८७१ रोजीं झाला. वऱ्हाडांतील सुधारकाग्रणी कै. रावबहादुर वामनराव कोल्हटकर ह्यांचे हे पुतणे. तात्यासाहेब पुण्याच्या डेक्कन कॉलेजांतून बी. ए. व मुंबईच्या लॉ कॉलेजमधून एलएल्. बी. झाले. साहित्यसम्राट् न. चिं. केळकर हे तात्यासाहेबांचे सहविद्यार्थी होते.

उच्च शिक्षण घेत असतांच तात्यासाहेबांची प्रवृत्ति नाट्य आणि टीकालेखनाकडे होती आणि आपलीं नाटकें किर्लोस्कर ह्या अग्रगण्य नाटकमंडळीनें करावीं आणि टीकालेख 'विविधज्ञानविस्तार' ह्या सर्वप्रमुख मासिकांत प्रसिद्ध व्हावे, अशी त्यांची उच्च महत्त्वाकांक्षा होती आणि ती लवकरच पूर्णही झाली. एका लोकप्रिय, परंतु हलक्या दर्ज्याच्या मराठी नाटकावर त्यांनीं खूप कडक टीका लिहिली आणि तीं 'विविधज्ञानविस्तारां'त प्रसिद्धही झाली. हा टीकालेख वाचून त्या नाटकाच्या लेखकानें, 'टीका करणें फार सोपें, पण नाटक लिहिणें महाकठीण,' असे उद्गार काढल्याचें ऐकून कोल्हटकरांनीं तें आव्हान स्वीकारलें आणि 'वीरतनय' हें आपलें पहिलें नाटक मोठ्या हिरीरीनें लिहिलें. कर्मधर्मसंयोगानें किर्लोस्कर मंडळीनें ह्याच वेळीं बक्षीस जाहीर करून प्रयोगांकरतां नवीं नाटकें मागविलीं होतीं आणि कोल्हटकरांच्या 'वीरतनय' नाटकालाच तें बक्षीस मिळून किर्लोस्कर मंडळीनें तें १८९६ सालीं रंगभूमीवरही आणलें. किर्लोस्कर मंडळी तोंपर्यंत करीत असलेल्या नाटकांपेक्षां 'वीरतनय' नाटक अगदींच निराळें असून त्यांतील संगीतही मराठी रंगभूमीवर अगदीं स्वतंत्र धर्तीचें होतें. ह्या नाटकांत सुप्रसिद्ध गायक नट कै. भाऊराव कोल्हटकर



भाऊराव कोल्हटकर

ह्यांची नायकाची भूमिका अतिशय तडफेची आणि विलक्षण आकर्षक होत असल्यामुळें तें नाटक अतिशय लोकप्रिय झालें आणि तात्यासाहेब एकदम पहिल्या दर्जाचे नाटककार बनले. 'वीरतनय' नाटकांत विविध तऱ्हेचें नावीन्य होतें. त्यानंतर लिहिलेल्या 'मूकनायक' नाटकांत तीच प्रथा कायम ठेवून त्यांतील संगीत त्यांनीं अधिक रंगदार आणि आकर्षक ठेवलें. भाऊराव कोल्हटकरांचा मृत्यु होऊन त्यांची वासवशक्ति किर्लोस्करांच्या रंगभूमीवरून लोप पावल्यावरही 'मूकनायक' नाटकाला त्याच्या अंगच्या गुणसमुच्चयामुळें अमाप लोकप्रियता लाभली. तें नाटक अनेक संगीत मंडळ्या करीत असत. त्यानंतर कोल्हटकरांचीं 'गुप्तमंजूष', 'मतिविकार' आणि 'प्रेमशोधन' हीं नाटकें किर्लोस्कर मंडळीनेंच रंगभूमीवर आणलीं. 'प्रेमशोधन' तर कै. गडकरी तात्यासाहेबांची श्रेष्ठ कृति समजत! त्यानंतर गद्य 'वधूपरीक्षा' भारत नाटक मंडळीनें १९१३ सालीं व संगीतरूपानें ललितकलेनें १९२८ सालीं रंगभूमीवर आणलें व नंतरचें 'सहचारिणी' गंधर्व मंडळी व 'जन्मरहस्य' बलवंत मंडळी करूं लागली. ह्यापुढेंही कोल्हटकरांनीं 'परिवर्तन', 'श्रमसाफल्य', 'मायाविवाह' व 'शिवपावित्र्य' हीं नाटकें लिहिलीं, परंतु तीं रंगभूमीवर आलींच नाहींत!

कोल्हटकरांनीं नाटकांशिवाय 'दुटप्पी कीं दुहेरी' व 'शामसुंदर' ह्या कादंबऱ्या आणि कांहीं लहान गोष्टीही लिहिल्या. त्यांच्या स्फुट कविता निरनिराळ्या मासिकांत प्रसिद्ध झाल्या असून त्यांचें संकलन 'गीतोपासन' नामक छोट्या पुस्तकांत प्रसिद्ध झालें आहे. ह्यांपैकीं 'महाराष्ट्रगीत' हें विलक्षण लोकप्रिय आहे व बहुधा महाराष्ट्रांतील लहानमोठ्या सार्वजनिक समारंभांत तें आदरानें म्हटलें जातें.

तात्यासाहेबांचा 'ज्योतिर्गणिता'चाही अत्यंत खोल अभ्यास होता आणि लोकमान्य टिळकांच्या सूचनेवरून त्यांनीं सांगली येथें भरलेल्या ज्योतिषसंमेलनाचें अध्यक्षपदही भूषविलें होतें. 'भारतीय ज्योतिर्गणित' हा त्यांचा ग्रंथ प्रसिद्धच आहे.

तात्यासाहेबांनीं अनेक मार्मिक टीकालेख लिहिले असून त्यांत त्यांची अभ्यासू सूक्ष्म अन्तर्दृष्टि आणि सहृदयता दृग्गोचर होतात.

मराठी वाङ्मयांत कोल्हटकरांनीं श्रेष्ठ विनोदाचें स्वतंत्र युगच सुरू केलें, असें म्हणायला हरकत नाहीं. रंगभूमीवर उत्कृष्ट विनोदी भूमिका त्यांनीं खेळविल्या. ती प्रथा त्यांचे शिष्य म्हणवून घेणारे गडकरी व इतर लेखक ह्यांनींही यशस्वीपणें चालविली. 'सुदाम्याचे पोहे' ह्या त्यांच्या विनोदी लेखांच्या प्रसिद्ध संग्रहाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत.

कोल्हटकरांच्या एकंदर लेखनाचेच कांहीं विशिष्ट गुण आहेत. त्यांनीं कधीं कसलें भाषांतर किंवा रूपांतर केलें नाहीं. त्याचा त्यांना तिटकाराच असे. कै. देवल ह्यांनीं एक वेळ कोल्हटकरांशीं कांहीं नाट्यविषयक वाद केला असतां तरुण कोल्हटकरांनीं त्यांना एकदम चक्क सुनावलें, "तुम्हांला ह्याविषयीं माझे दोष काढायचा काय अधिकार आहे? तुम्हीं आजवर ('शारदे'पूर्वींची ही गोष्ट आहे) भाषांतराशिवाय काय केलें आहे?"

कोल्हटकर मोठे सौंदर्योपासक होते आणि त्यांची नैसर्गिक प्रवृत्ति अद्भुतरम्य कल्पनाविहाराकडे होती. वास्तवाला ते सुंदर कलाविलासानें आपल्या गद्य-पद्य लेखनांत तन्मयतेनें तेज देऊन रंगवीत. त्यामुळें त्यांचें लिखाण कांहीं कांहीं स्थळीं दुर्बोधही होत असे. क्वचित् विनोदाकरतां विनोदालाही ते बळी पडत. परंतु ह्या सौंदर्यकलाकुशल दृष्टीमुळेंच कोल्हटकरांना मराठी वाङ्मयांत त्यांचें उच्च पद मिळालें आहे, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

तात्यासाहेब पुणें मुक्कामीं ता. १ जून, १९३४ रोजीं दिवंगत होऊन मराठी साहित्यांत जी मोठी थोरली पोकळी निर्माण झाली आहे, ती अजूनही भरून निघाली नाहीं!

# वधूपरीक्षा नाटकांतील पात्रें

धुरंधर : संस्थानचा राजा.

भार्गव : त्याचा मित्र.

पार्थिव : त्याचा भाचा.

प्रयागपंडित : संस्थानचे न्यायाधीश.

विश्वेश्वरशास्त्री : शहरांतील एक सुखवस्तु गृहस्थ.

खंडेराव : कोतवाल.

श्रीपति : त्याचा सावत्र मुलगा.

राणीसाहेब : धुरंधरची आई.

त्रिवेणी : प्रयागपंडिताची मुलगी.

यमुना : तिची मैत्रिण.

गंगू : विश्वेश्वरशास्त्र्यांची मुलगी.

वाराणशी : त्यांची बायको.

म्हाळसा : त्यांच्या घरची मोलकरीण.



# मति कुंठिता अति चिंतिता...

हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्याला लागून, सुमारें चार कोटि रुपये उत्पन्नाचें एक संस्थान होतें. त्याचा तरुण मालक धुरंधर, बारा वर्षें शिक्षणासाठीं विलायतेंत राहिला असतां, त्याची विधवा आई त्याच्या वतीनें संस्थानचा कारभार मोठ्या हुषारीनें आणि दक्षतेनें पाहात असे. शिक्षण पुरें झाल्यावर, धुरंधर आपल्या संस्थानांत परत यावयाला निघाला, तो विशिष्ट हेतु मनांत धरून. राजधानींत साध्यासुध्या, पण गुप्त रूपानें राहून, आपणाला अनुरूप अशी रूपगुणसंपन्न वधू शोधून काढावयाची आणि तिच्याशीं विवाह करून प्रकटरूपानें राज्यकारभार हातीं घ्यावयाचा, असा त्याचा हेतु होता. त्याच्या ह्या कौतुकाच्या बेताला त्याची प्रेमळ आई सामान्यपणें अनुकूल असली, तरी हा अलौकिक हेतु सिद्धीला जातांना, त्याचें तारुण्य

आणि अननुभव ह्यांमुळें अनेक लहानमोठीं संकटेंही निर्माण होणें शक्य आहे, असा तिनें धुरंधराला सावधगिरीचा इशाराही देऊन ठेवला होता. परंतु त्याच्यासारख्या सुशिक्षित, नम्र आणि चतुर पुत्राच्या प्रेमळ आग्रहाला शेवटीं तिला संमति द्यावीच लागली. धुरंधराच्या गुप्त वास्तव्याला साहाय्य म्हणून त्या मायलेकरांनीं अशी हूल उठविली, कीं धुरंधरासारखा हुबेहूब दिसणारा एक तरुण तोतया त्याची गादी हस्तगत करूं पाहात असल्यामुळें, खुद्द धुरंधराच्या प्राणाला अपाय न व्हावा म्हणून त्याला बंदरशहरीं कडक पाहाऱ्यांत ठेवण्यांत आलें असून कोणालाही त्याला भेटण्याची परवानगी नाहीं !

असा पक्का बंदोबस्त करून, राणीसाहेबांच्या दूरदृष्टीच्या सूचनेवरून धुरंधरानें शहरांतील विश्वेश्वरशास्त्री नामक संपन्न गृहस्थांच्या घरीं ज्योतिष्याच्या रूपानें राहावें असें ठरलें. तेथें विश्वेश्वरशास्त्र्यांची मुलगी गंगू व तिची मैत्रीण यमुना ह्या दोघी उत्कृष्ट सौंदर्यसंपन्न तरुणी असून, धुरंधर त्यांची परीक्षा विनायास करूं शकणार होता.

धुरंधर आणि राणीसाहेब ह्यांनीं आपल्या ह्या गुप्त बेतांत धुरंधरचा निकट मित्र भार्गव ह्यालाही सामील करून घेतला होता. विलायतेंत धुरंधराबरोबरच त्याचेंही शिक्षण राणीसाहेबांनींच करविलें असून, तो धुरंधराबरोबरच हिंदुस्थानांत आला होता. राणीसाहेब त्याला मुलाप्रमाणेंच मानीत असत.

भार्गवाच्या स्वर्गस्थ पित्याचें एक गूढ रहस्य होतें. त्याच्या मृत्यूपूर्वी सतरा वर्षें एका श्रीमंत पांथस्थ गृहस्थानें, यात्रा करतां

करतां त्याच्या घरीं येऊन आपली छोटी मुलगी त्याच्या स्वाधीन केली होती व तिच्या पालनपोषणासाठीं लागणारें भरपूर द्रव्यही सोन्यानाण्याच्या रूपानें त्याच्या स्वाधीन करून तो निघून गेला होता. मात्र, कदाचित् पुढें प्रसंग आल्यास, त्या टाकलेल्या मुलीची ओळख पटावी म्हणून, एक जस्ताचा ताईत तिच्या गळ्यांत त्यानें बांधला होता. त्यांत एक सांकेतिक आकृति काढलेला कागद त्यानें घालून ठेवला असून त्या आकृतीचा अर्धा भाग त्यानें आपणापाशीं ठेवून दिला होता. कर्मधर्मसंयोगानें त्याच दिवशीं दुसरा एक पांथस्थ भार्गवाच्या बापाच्या घरीं आला होता. परंतु मुलीच्या पालनार्थ दिलेली भरपूर संपत्ति, तिचा बाप परत आल्यास आपल्याला परत द्यावी लागेल ह्या भयानें, भार्गवचा बाप पापी लोभाला वश झाला, आणि त्या दुसऱ्या पांथस्थाच्या भिस्तीवर मुलीला सोडून, त्यानें कुटुंबासह खुशाल देशान्तरीं पलायन केलें ! पण न्यायनिष्ठुर दैवानें त्याचा पाठलाग केल्यामुळें तापाच्या भयंकर साथींत त्याचे सर्व मुलगे व बायको हीं मृत्यु पावलीं व भार्गवच काय तो उरला ! दैवाच्या ह्या दारुण शासनामुळें त्या गृहस्थालाही कृतकृत्याचा अतिशय पश्चात्ताप झाला. केलेल्या घोर पापाची आपण जर थोडीफार भरपाई केली नाहीं, तर परलोकींही शांति न मिळतां आपणाला चिरकाल तळमळावें लागेल, अशी त्याला अंतकालीं भीति वाटूं लागली आणि त्या वेळीं, भार्गव वयांत आल्यानंतर त्याला राणीसाहेबांमार्फत मिळेल अशी व्यवस्था करून त्यानें मृत्युपत्र केलें. ज्या अज्ञान मुलीचा आपण घोर विश्वासघात केला, तिचा जस्ती ताइताच्या अनुरोधानें शोध करून, तिला आपली बहीण समजावी आणि तिला शक्य तेवढ्या मोठ्या वैभवाला

चढवावें, तरच परलोकीं आपणाला शांति मिळेल, असें भार्गवाला त्यानें मृत्युपत्रांत कळकळून लिहिलें होतें.

धुरंधराबरोबर भार्गव हिंदुस्थानांत येतांच हें मृत्युपत्र राणीसाहेबांनीं भार्गवच्या स्वाधीन केलें. वस्तुतः भार्गव आपला जीवश्च कंठश्च मित्र धुरंधर ह्याच्याशीं अगदीं एकजीव आणि सहमत असे. वधूपरीक्षेच्या धुरंधराच्या नावीन्यपूर्ण बेताला भार्गवची आजपर्यंत पूर्ण संमति होती. परंतु वडिलांचें मृत्युपत्र वाचल्यानंतर, त्यांच्या शेवटच्या इच्छेप्रमाणें, त्यांनीं टाकलेल्या मुलीला बहीण मानून, तिचा शोध लावून तिला हरप्रयत्नानें धुरंधराचें राज्ञीपद मिळवून द्यावयाचा त्यानें दृढनिश्चय केला. तरीपण आपला हा निश्चय खुद्द धुरंधरापाशीं प्रकट करतां येत नसल्यामुळें त्याला वाटत होतें—

**भार्गव :**

**शिरीं भार भारी महा । कांपि आजि हा ॥**
**वयहि अल्प मम । अनुभव तैसा । घोर विषमता हा ॥**

शेवटीं, मनाचा दृढनिश्चय करून, स्वतःच्या हिंमतीवरच भिस्त ठेवून 'बहिणी'च्या शोधाचें काम गुप्तपणें चालू ठेवण्यासाठीं भार्गवानें तेथील 'दुंदुभि' वर्तमानपत्रांत अशी जाहिरात दिली — "सतरा वर्षांपूर्वीं विजयादशमीच्या मुहूर्तावर एका इसमानें एक अमोल ठेव दुसऱ्याच्या स्वाधीन केली. त्या दोन इसमांपैकीं एखादा येथील स्मशानांत शनिवारीं मध्यरात्रीं आल्यास त्याला मोठा लाभ प्राप्त होईल. ती ठेव अंतीं एका राजकुलीनाला मिळणार आहे, म्हणून राजकुलीनांनीं कोणत्याही महत्त्वाच्या बाबतींत घाई करूं नये — वेताळ."

वस्तुतः ती 'ठेव'—म्हणजे आपली मुलगी—भार्गवच्या बापाच्या स्वाधीन करणारे गृहस्थ म्हणजे, संस्थानचे सरन्यायाधीश प्रयागपंडित हे होत. ह्या न्यायमूर्तींची बायको ह्या मुलीला जन्म देतांना निधन पावली. ह्यामुळें अत्यंत वैतागाच्या भरांत प्रयाग-पंडितांनीं मुलीचा असा अमानुष त्याग केला. परंतु लवकरच त्यांना ह्या परमनिष्ठुर कृतीबद्दल अत्यंत पश्चात्ताप होऊन ते मुलीचा शोध घेऊं लागले. पण तो माणूस बेपत्ता झाल्यामुळें ती सांपडेना! आपल्या हाताखालील खंडेराव कोतवालावर मुलीचा शोध लावण्याचें काम प्रयागपंडितांनीं सोपविलें होतें व ते त्याला त्याबद्दल घाई करीत होते. कारण, मुलीचा शोध लावून धुरंधरशीं तिचा विवाह करून द्यावा, अशी त्यांची उत्कट इच्छा होती. कोतवालाला 'दुंदुभि' पत्रांतील 'वेताळा'ची जाहिरात वाचून दाखवून प्रयागपंडित त्याला म्हणाले—

**प्रयाग०** : जाहिरात देणाराला माझ्या बाळेची माहिती खास आहे. तुम्ही शनिवारीं रात्रीं ह्याचा छडा लावण्याकरितां स्मशानांत गेलें पाहिजे.

**खंडेराव** : (एकीकडे) अग बयां! इक्त्यामंदीच माज हातपाय प्येंडुळलं! न्हाई सरकार, ह्ये काम आपनास्नीच ग्वाड दिसतं. प्वार आपली, तवां आपुनच जावं चखोट!

**प्रयाग०** : त्या मुलीचा बाप मी आहें, हें जर उघड झालें, तर एखादा भामटा खोटीच मुलगी माझी म्हणून मजवर लादायचा. तें कांहीं नाहीं. तुम्हीच त्या मुलीचा बाप म्हणून पुढें आलें पाहिजे. तुम्ही एकटेच गेलां पाहिजेत.

मित्र्या कोतवालाला न्यायाधीशमहाराजांची आज्ञा मान्य करणें भागच पडलें. परंतु स्वतः स्मशानांत न जातां आपला सावत्र मुलगा श्रीपति ह्यालाच परस्पर तिकडे पाठवावयाचें त्यानें मनांत

ठरविलें! 'शिरप्या म्येला तर ब्याद गेली!' हा होता त्याचा विचार!

श्रीपतीला ह्या बाबतींत खोटेपणा बेलाशक करावयाची खंडेराव दीक्षा देत असतां श्रीपति त्याला म्हणाला —

श्रीपति : ह्ये तर मला लई वंगाळ गवसतया.

खंडेराव : बगून घ्या पोराचं श्येनपन! घ्ये तर मंग त्येचं शास्तार! ज्येला खोटं बोलायचं, त्येनं आदी मनाला हटकावं का मी खोटं बोलतों म्हून्, आन् मंग लावावा सपाटा. म्हंजी मंग त्येच्या मंदीं पाप कुटं ऱ्हायलं?

श्रीपति : मी अक्षी उगडउगड सांगतुया—

खंडेराव : ह्ये काय ल्येका, ख्येडवळावानी उगडंन् नागडं करीत बसला हैस? शेरच्या इद्वानावानी सपस्ट असं म्हन. ह्येलाच संवस्कुत्र म्हनत्यात. वंगाळ असलं तरीबी त्ये संवस्कुत्रामंदी म्हंतलं मंजी ग्वाड दिसतं. वंगाळ काम करावं म्हराटीमंदी आन् ब्वोलावं सवस्कुत्रामंदी, मजी घ्येवाम्होरं त्येचं समद गुन्ह माप! आपला समदा धरम हाय संवस्कुत्रामंदीच.

ठरल्याप्रमाणें धुरंधर ज्योतिष्याच्या वेषानें विश्वेश्वरशास्त्र्यांच्या घरीं आणि भार्गव, गंगूची (विश्वेश्वरशास्त्र्यांची मुलगी) मैत्रीण यमुना हिच्या घरीं मस्तिष्कशास्त्री म्हणून राहिला. त्या दोन्ही मुली गुणी असल्या तरी धुरंधरला पाहिजे असलेले वधूचे गुण त्यांच्या ठिकाणीं त्याला आढळले नाहींत. भार्गवचें मन मात्र यमुनेनें ओढून घेतलें. 'ताईताची मुलगी' शोधून तिला धुरंधराची राणी करावी, असा भार्गवचा उत्कट हेतु असल्यामुळें इतर मुलींकडे त्याचें मन ओढूं नये, असा तो दृढ प्रयत्न करीत होता.

भार्गवचा हा प्रयत्न फारसा सफल होण्याचें चिन्ह दिसेना, तेव्हां तो कांहींशा निराशेनेंच स्वतःशीं म्हणाला —

भार्गव : ताई, ह्या अवाढव्य जगांत तुला कोठें शोधूं ? तूं असशील तरी कोणत्या स्थितींत ? तुझा वास सुंदर महालांत असेल कीं भिकार झोंपड्यांत ? तुला सुग्रास अन्न खावयास मिळत असेल कीं वाळलेलं कदन्न ? जर तूं दुःखाच्या दरींत पडली असशील तर तुला सुखपर्वताच्या अत्युच्च शिखरावर बसविण्याचें सामर्थ्य मला आहे. पण तुझं वास्तव्यच माहीत नसल्यामुळें मी पंगूपेक्षांही पंगु बनून गेलों आहें. का तुझी प्राणज्योतिच मालवली, असं मी समजूं ? तसं झालं असेल तर माझ्याही आयुष्याची इतिकर्तव्यता संपली.

मति कुंठिता अति चिंतितां । न कळत वदनचंद्र ठायिं कवण
निजकिरणीं गेह करित रम्य उसळवि हृदयजलधि भंवता ॥ ध्रु० ॥
संकटराहु तया ग्रासी का । लपोनि छपोनि अधमकुमतिघन ।
छळुं सजति सतत मधुनि मधुनि सर्वथा ॥ १ ॥

शास्त्रीबुवांच्या घरीं एकदा बैठकींत मुलीबाळी ज्योतिषीबुवांना कौतुकानें हात दाखवीत होत्या.

वाराणशी : जोशीबुवा, सांगा बरं ह्या यमुनेनें मनानें कोणाला वरलं आहे ?

धुरंधर : ह्यांनीं हात दाखविला म्हणजे सांगतों.

यमुना : मी नाहीं दाखवायची हात कुणाही परक्या पुरुषाला !

धुरंधर : यमुनाताई, तुम्ही चुकतां. स्त्री कितीही पतिपरायण असली तरी तिला कासाराला, वैद्याला आणि ज्योतिष्याला हात दाखवावा लागतो.

यमुना : मीं एकदा तुम्हांला सांगितलं ना, कीं मी हात दाखविणार नाहीं, तेंच कायमचें समजा. माझी आपली झांकली मूठ सव्वालाखाची आहे, तीच बरी आहे. तुम्ही एवढे ज्योतिषी म्हणवितां आणि मी हात दाखविणार नाहीं हें माहीत असतां तुम्ही मला इतका आग्रह करतां, ह्याचं मला भारी नवल वाटतं. अशानें मला निराळ्याच अर्थानें हात दाखवावा लागेल !

धुरंधर : (एकीकडे) भार्गवानें सांगितल्याप्रमाणें हट्टी स्वभाव आहे खरा !

धुरंधरानें त्रिवेणीचाही ( विश्वेश्वरशास्त्र्यांनीं पाळलेली प्रयाग-पंडितांची अज्ञात कन्या ) हात पाहिला.

धुरंधर : ( एकीकडे ) हा हात किती स्निग्ध आहे आणि हा चेहेरा तरी लाजेनें किती मोहक दिसत आहे ! हिचीं हीं जाडीभरडीं वस्त्रं हिला कशींशींच दिसतात.

त्रिवेणी : ( एकीकडे ) ह्यांच्या हातांत हात दिल्यापासून मला जन्मांत लाधलं नाहीं इतकं सुख होत आहे ; आणि असं वाटतं, कीं हाताप्रमाणें आपलं सारं जीवितही ह्यांच्याच स्वाधीन करावं !

तिच्या हातावर राजचिन्हें दिसून आल्यामुळें तो तिच्याकडे सहजच आकृष्ट झाला. शिवाय, त्रिवेणी तशीच रूपगुणवती होती. त्रिवेणीचेंही मन धुरंधराकडे सहजच ओढलें गेलें ! ह्याच बैठकींत, खंडेराव कोतवालही आला.

खंडेराव : ( स्वतःशीं ) त्या सोंगाड्याचा पत्त्या लावायचं कामबी माज्याकड आलं ह्यॆ लई ब्येस ! काय त्या सोंगाड्यास म्हनत्यात वरं ? हं, तायत्या–न्हव्ह, तोयत्या.

वाराणशी : यावें कोतवालसाहेब, कशी काय महाराजांकडची खबर ? खुशाल आहेत ना ?

खंडेराव : हैत म्हनायचं, न्हाइतर काय ?

वाराणशी : ( भयानें ) म्हणजे ?

खंडेराव : त्येंच्यावर जरा हाय परसंग.

गंगू : म्हणजे ? बोला तरी लवकर.

खंडेराव : योक तोयत्या म्हाराजांची गादी अंगाखालीं घालाया पगतुया. चेऱ्याम्होऱ्यानं अक्षी म्हाराजावानीच दिसतुया म्हनत्यात. त्येचा डाव फसवाया म्हाराजानीबी आपल्या भोवतालनं अक्षी खडा प्हारा ठिवलाया.

वाराणशी : मग तुमची त्यांची गांठ पडली नाहीं म्हणायची ?

खंडेराव : ह्यो गडी त्येंची गांट घेतल्याबगर येणार व्हय ? अव गांटीचं काय, पन म्हाराज माज्यासंग दोन सबूद बोललबी !

वाराणशी : तें कसं काय ? सांगा सगळें आम्हांला.

खंडेराव : योक प्हारावाला माजा व्हता दोस्त. त्येला दिली जरा मदत.

वाराणशी : त्याची मदत घेतली म्हणतां ?

खंडेराव : तसं नव्ह. त्येला मदत दिली — पाजली. आन् जवा का त्यो गडी झिंगलाय् तवा दिली त्येला झुकांडी, आन् जिन्यामंदी जाऊन व्हायलों उबा; आन् जवा म्हाराज जिना उतराया लागल तवा म्हनत्यात कस, "कोन र त्यो हरामखोर उबा हाय तत ?" म्या जो म्हनता सूबाल्या हाकला, तो ह्ये शेरच गांटलं.

वाराणशी : वा ! महाराज चांगलेच गोड शब्द बोलले तुमच्याशीं !

खंडेराव : बोललत सई !

धुरंधर : ( एकीकडे ) काय गप्पीदास आहे पाहा ! ( उघड ) तुम्हीं महाराजांना पाहिलं म्हणतां ? ते माझ्यासारखे दिसतात का ?

खंडेराव : ( एकीकडे ) ह्ये मोटी पंचाईत आलीया, पन् ह्यो मरद काय दाद घेनार ह्येला ? (उघड) व्हय दिसत्याती. दोगांचीं त्वांडं यकावानी येक. वाईच अंतर हाय बगा. त्येंचा मुखडा दिसतुया अक्षी मदनावानी, आन् तुमचं मुस्काट दिसताया घुबडावानी !

धुरंधर : बरं, ऐट तरी ?

खंडेराव : त्येंची मरदावानी, आन् तुमची हाय मुर्दावानी !

त्रिवेणी : ( एकीकडे ) काय मेला तोंडास येईल तें बरळत सुटला आहे !

थोड्याच क्षणांनीं धुरंधर व त्रिवेणी ह्यांची एकीकडे भेट झाल्यावर त्यांचें असें संभाषण झालें—

त्रिवेणी : आपणांला फार वाईट वाटलं असेल नाहीं ?

धुरंधर : तूं आहेसच का येथें उभी ? मला वाटलं मीं अगदीं एकटाच आहें.

त्रिवेणी : एकट्याला दुकटें असलें म्हणजे दुःखांत सुख वाटतें नाहीं ?

धुरंधर : तुझ्यासारखी सांत्वन करणारी असली म्हणजे तें दुःख सुखमयच होऊन जातें. मला ह्या घरच्या माणसांचा राग येतो तो तुझ्यासाठीं. तुझ्यासारख्या गरीब गाईशीं अशी कसाबासारखी करणी करायला त्या वाराणशीला लाज तरी कशी वाटत नाहीं ?



धुरंधर : ... तुम्हीं महाराजांना पाहिलं म्हणतां ? ते माझ्यासारखे दिसतात का ?

**त्रिवेणी :** त्यांच्यावर असें रागावूं नये. अलीकडे मात्र मी कदाचित् गंगूताईच्या सुखाच्या आड येईन, अशी शंका येऊन त्या मला बरें पाहिनाशा झाल्या आहेत. त्यांना वाटतें, मी धुरंधरमहाराजांच्या दृष्टीला पडलें, कीं ते गंगूताईस सोडून माझाच स्वीकार करतील. वास्तविक पाहिलें तर गंगूताई माझ्यापेक्षां कितीतरी श्रेष्ठ आहे! काकूंनीं गंगूताईच्या हितासाठीं माझें कितीही नुकसान केलें, तरी मी त्यांना मनापासून क्षमा करीन. तुम्ही काकूंकडे माझ्या दृष्टीनें पहाल, तर तुम्हांला त्यांचा राग येणार नाहीं.

**धुरंधर :** तुझ्या दृष्टीनें पाहूं? तुझ्या दृष्टीनें जगाकडे पाहिलें तर त्याला स्वर्गाचें स्वरूप येईल.

परिसापरी। हिणकसा बहुमोल।
तव हा शुभ कटाक्ष स्पर्शमात्रें करी॥ ध्रु०॥
करित उपवन वना। सुजन कुजना तेंवि।
निष्पाप धरणीसि दुरितमय ती जरी॥

त्रिवेणी, मला तुझ्या दृष्टीनें पाहातां येत नाहीं, ह्याची मला क्षमा कर.

**त्रिवेणी :** त्यांना वाटतें, मला राज्याचा लोभ आहे, पण माझी इच्छा किती मर्यादित आहे, हें त्यांना कसें कळावें? धुरंधरमहाराजांशीं मी लग्न करणार नाहीं, अशी शपथ जरी मीं वाहिली, तरी तें त्यांना खरें वाटणार नाहीं.

**धुरंधर :** आणि अशी भलती शपथ मी तुला घेऊंही देणार नाहीं. (जातो.)

**त्रिवेणी :** (स्वतःशीं) एकूण ह्यांची इच्छा मीं त्यांच्याशीं लग्न करावें अशी दिसते. माझें दुर्दैव! दुसरें काय? ह्यांचें हृदय किती थोर आणि कोमल आहे हें! आमची उतावळी गंगूताई आणि तो मेला कोतवाल ह्यांना नाहीं नाहीं तसें टाकून बोललीं! पण तें सारें विसरून ह्यांनीं माझ्यासारख्या सामान्य मुलीच्या हेळणेबद्दल इतकी हळहळ दाखवून औदार्याच्या भरांत मीं राणी व्हावं अशी देखीऊ इच्छा दर्शविली. महाराज, आपण दूरदूरच्या ग्रहांच्या गति अचूक सांगतां, पण माझ्यासारख्या अजाण मुलीच्या हृदयाचा ओघ कोणत्या दिशेला वाहात आहे, हें मात्र आपणाला उमगूं नये ना?

म. ग. मं. ठाणें, वाचनालय शाखा.
पु. क्र. .. वॉ. लि

बालिकाभाव शुचि । मूर्त जणुं सरलता ॥
नच जशी ग्रहगता । संकीर्ण कुटिल गति ॥ ध्रु० ॥
विविध गति गगनिंच्या । शक्त शोधावया ।
आकळुं न शकत या । अंतरा कोंवि मति ॥

त्यांच्या दैवी प्रेमाची मला प्राप्ति झाली असती, तर माझ्यासारखी सुखी मीच असतें ! पण माझ्या सुखाकरितां त्यांनीं आपल्या उच्च स्थानावरून ढळावें हा विचार माझ्या निर्मल प्रेमाला मुळींच शोभण्यासारखा नाहीं.



# कार्यभार कठिण फार...

भार्गवनें 'दुंदुभि' पत्रांत दिलेल्या त्या लोकविलक्षण जाहिरातीचे संबंधित लोकांवर निरनिराळे परिणाम झाले. विश्वेश्वरशास्त्र्यांवर तर विशेषच परिणाम झाला. त्यांची बायको वाराणशी ही, आपली मुलगी गंगू हिच्याऐवजीं त्रिवेणीच राजाची राणी होईल, ह्या आशंकेनें भिऊन जाऊन त्रिवेणीला घराबाहेर काढावयाचा त्यांना आग्रह करीत असतां त्या पती-पत्नींत पुढील संवाद झाला --

वाराणशी : मी काय म्हणतें इकडे लक्ष आहे ना? ही डोक्यावर घेतलेली पोरच उद्यां राणी होऊन आपल्या डोकीवर मिरीं वांटायला लागणार! मला हें कांहीं खपणार नाहीं. मी माझ्याकडून आपणाला हजार वेळां सांगितलं, कीं ही सुस्ती बरी नाहीं म्हणून! तिला कांहीं सुमार? कशी झाली तरी गंगू आपली पोटची लेंक. तिची काळजी आपणालाच वाहिली पाहिजे. पण तिची काळजी करतो कोण? नेहमी झोंप, झोंप, झोंप! ही पाहा आतांही झोंपच चालली आह.

विश्वेश्वर : झोंप घेऊन माझें नुकसान तें काय झालें ?

वाराणशी : बरं आहे. घ्या झोंप तुम्ही. ती कारटी त्रिवेणी राणी होऊन अंमल चालवायला लागली, म्हणजे आपोआप तुमच्या झोपेचा अंमल उडेल !

विश्वेश्वर : त्रिवेणी झाली तरी ती आपल्या मुलीसारखीच नाहीं का ? तिचें सुख तें आपलेंच सुख म्हणायचें !

वाराणशी : म्हणे तिचें सुख तें आपलेंच सुख ! तुम्ही म्हणतां हें जर खरें, तर मग ती गिळते तें तुम्हींच खाल्ल्यासारखें नाहीं का होत ? मग जेवण कशाला पाहिजे ?

विश्वेश्वर : बरं, म्हणणें काय तुझें ?

वाराणशी : तिला घरांतून काढून द्या.

विश्वेश्वर : काय म्हणतेस ? तिला काढून लावूं ? आजपर्यंत एखाद्या ठेवीप्रमाणें तिचें रक्षण करून अखेरीस तिचा विश्वासघात करूं ? मी थंड प्रकृतीचा आहे खरा; पण तत्त्वावर गोष्ट आली म्हणजे माझ्यासारखा हट्टी मनुष्य तुला सापडणार नाहीं. मी साफ सांगतों, कीं तिला घराबाहेर काढण्यापेक्षा दुसरें कोणी निघून गेलें तरी मला पत्करेल.

वाराणशी : देवा रे देवा ! कोण ही छळणूक ! ह्यापेक्षां तूं माझे डोळे कां नाहीं झांकत ?

विश्वेश्वर : डोळे झांकण्याची माझ्याप्रमाणेंच तुलाही इच्छा झाली तर ? आतां तरी माझ्या डोळेझांकीकडे डोळेझांक करशील ना ?

वाराणशी : माझा चालला आहे प्राण आणि तुमचा होतो आहे खेळ ! कोणीकडून आपल्याशीं माझी गांठ पडली देव जाणे !

विश्वेश्वर : आपली जन्माची गांठ पडली नसती, तर मलाही तुजप्रमाणेंच समाधान झालें असतें. पण करणार काय ? आपल्या लोकांत अल्पस्वल्प गोष्टी असतात मनुष्याच्या हातांत; पण लग्नासारखी जन्मभर पुरणारी गोष्ट मात्र हातीं नसते ! तुझे वडील माझ्या वडिलांना भेटले; त्यांनीं कागदाच्या एका चिटोऱ्याची दुसऱ्या चिटोऱ्याशीं तुलना केली; अखेरीस तुला आणि मला जन्मभर झगडण्याकरितां विवाहरज्जूंनीं घट्ट आवळून टाकलें. आगगाडीच्या

डब्यांत बसणारांची जशी परस्परांशीं ओळख नसते, तशी तुझी माझीही नव्हती; पण आगगाडीचा प्रवास असतो थोड्या पल्ल्याचा आणि आपला आहे जन्माचा!

पुढें थोड्याच क्षणांत त्रिवेणीला बोलावून विश्वेश्वरशास्त्र्यांनीं तिला थोडीशी कल्पना दिली.

विश्वेश्वर : मी तुझा कोण आहें, सांग पाहूं.

त्रिवेणी : तुम्हीं दाखविलेल्या प्रेमानें आणि केलेल्या उपकारांनीं मला वडिलांपेक्षांही अधिक आहां. तुम्हाला बाबा म्हणायला मला जसा अभिमान वाटतो, तसा राजाची मुलगी म्हणवून घेण्यांतही वाटणार नाहीं.

विश्वेश्वर : तें मला माहीत आहे. बाळे, तुझा जन्मदाता पिता तुझा शोध करीत आहे, असं ह्या जाहिरातीवरून दिसतें.

त्रिवेणी : माझ्या वडिलांच्या भेटीपासून मला जरी आनंद झाला, तरी आपल्या वियोगामुळें होणारें दुःख त्यानें कसें कमी होणार?

मानिलें पित्याहुनि मी। आपणांसि भावें। हें न काय ठावें॥ ध्रु०॥
गणियलें सुतेला। ही तशीच बाला। अद्या मतिला अजि कां करावें॥

तुम्हीं जरी मला लाथेनें झुगारून दिलें, तरी मी हे पाय सोडणार नाहीं.

त्रिवेणीचें अपार दुःख पाहून, यमुनेच्या सूचनेवरून, तिला जवळच्या आरामबागेकडे धुरंधराबरोबर पाठवावयाचें शास्त्रीबुवांनीं ठरविलें आणि त्याला बोलावून आणून, शनिवारीं स्मशानांत जावयाची कामगिरी सांगितली. नाहीं तरी धुरंधर स्वतः होऊन तिकडे जाणार होताच.

विश्वेश्वर : जोशीबुवा, मी आपणाला एकांतीं बोलवण्याचं कारण जरा चमत्कारिक आहे. 'दुंदुभि' पत्रांतील ही जाहिरात आपण वाचली असेलच?

धुरंधर : होय, वाचली आहे.

विश्वेश्वर : ह्या जाहिरातीचा माझ्या हिताशीं बराच संबंध येतो, म्हणून हिच्यांत लिहिलेल्या वेळीं स्मशानांत कोण कोण येतें, हें कळण्याची मला

उत्कंठा लागली आहे. हें काम सांगण्याला योग्य असा आपणावांचून दुसरा मनुष्य मला दिसेना, म्हणून आपणास तसदी दिली.

धुरंधर : आपण मला विश्वासाला पात्र ठरविलेंत, हे आपले मोठे उपकार आहेत. मी आपलें हें काम होईल तितक्या सावधगिरीनें पार पाडून आपला विश्वास अस्थानीं नाहीं, असें आपल्या प्रत्ययाला आणीन, अशी आशा आहे.

**कार्यभार कठिण फार मम शिरिं जो नियोजिला । ठरुनि पात्र त्या यश मिळविन धन्यचि तरी होइन ॥ धृ० ॥**

**परका मी परि आश्रय दिधला । स्वजन तेंवि हा जन मानियला । या उपकारें असे बद्ध हा देह सोडविन ॥**

शनिवारीं रात्रीं कोतवालाच्या सांगण्याप्रमाणें श्रीपति स्मशानांत गेला आणि तिथें खुशाल झोंपून राहिला. तोंच धुरंधर आणि भार्गव निरनिराळ्या मार्गांनीं स्मशानांत आले. धुरंधरनें श्रीपतीला हलवून जागें केलें, तेव्हां कुणबाऊ भाषेंत त्यानें आश्चर्योद्गार काढतांच, तो ब्राह्मण नसून कुणबी असल्याचें कळून येऊन तो आणि भार्गव हे दोघेही चकित झाले! धुरंधरनें येऊन शास्त्रीबुवांना, आलेला इसम ब्राह्मण नसून कुणबी असल्याचें सांगतांच, त्यांना सखेदाश्चर्य वाटलें. शास्त्रीबुवांच्या पाळतीवर असलेल्या त्रिवेणीनें तें ऐकलें. आपण ब्राह्मण नसून शूद्र आहों; आणि शास्त्रीबुवांसारख्या पवित्र ब्राह्मणाच्या घरांत राहिल्यामुळें ते व सर्व कुटुंबच मोठ्या संकटांत सापडलें असतें तें टाळण्याकरितां, निःसीम कृतज्ञतेमुळें, त्रिवेणी आत्मघाताला प्रवृत्त झाली आणि शास्त्रीबुवा व आपले वल्लभ जोशीबुवा ह्यांना सुखी ठेवण्याविषयीं देवाची प्रार्थना करून तिनें दारच्या विहिरींत उडी घेतली. तोंच ( यमुनेच्या सूचनेवरून ) तिच्या मागावर असलेला धुरंधर लगबगीनें तिथें आला. त्रिवेणीला

वांचविण्याकरितां त्यानें तिच्या मागोमाग विहिरींत उडी घेतली आणि धक्क्यानें मूर्च्छित पडलेल्या आपल्या हृदयवल्लभेला प्रयासानें उचलून त्यानें सुरक्षितपणें वर आणलें.

धुरंधर : त्रिवेणी, डोळे उघड आणि माझ्याकडे पाहा. उडी टाकतांना माझें कल्याण चिंतिलेंस आणि आतां माझें अकल्याण करायला कां प्रवृत्त झाली आहेस? नाहीं ना तुला माझी दया येत?

त्रिवेणी : (सावध होऊन) मी कुठें आहें?

धुरंधर : अहाहा! शेवटीं माझी प्रार्थना सफल झाली! त्रिवेणी, तूं आपणावर आणि आपल्या प्रियजनांवर केवढें तरी संकट आणायला उद्युक्त झाली होतीस? गेलें ना मद्यांचें वेड डोक्यांतून?

त्रिवेणी : आठवलं सारं माझं दुर्दैव! मी शूद्राची मुलगी आहें, असें आपल्याच मुखानें मला कळलें. आतां बाबांना जें संकट वाटेल, त्यांतून त्यांची सुटका करण्याकरितांच मी प्राण देणार होतें; स्वार्थबुद्धीनें देणार नव्हतें.

धुरंधर : त्रिवेणी, तुझ्या कोणत्या कृत्याच्या मुळाशीं स्वार्थबुद्धि असते म्हणून ह्याच्या मुळाशीं असेल? इतरांना काय वाटेल इकडे तुझें अगदींच दुर्लक्ष होतें. तुझ्या प्रेमाचें माणूसच नाहीं म्हणतेस?

त्रिवेणी : एक माणूस आहे आणि त्याची आठवण उडी टाकतांना मीं केलीही होती.

धुरंधर : तुला त्याची आठवण क्षणभरच झाली असेल; पण तुझा प्राणत्यागाचा हेतु सिद्धीला गेला असता, तर तूं त्याला जन्मभर तुझी आठवण काढीत रडत बसविलें असतेंस.

त्रिवेणी : मी वांचून तरी त्यांना काय फायदा होणार?

धुरंधर : जन्मभर तुझ्या संगतींत वास व तुझ्या सद्गुणांचें अनुकरण करण्याची संधि, हा काय लहानसहान फायदा झाला कीं काय?

त्रिवेणी : तें ह्या जन्मीं शक्यच नाहीं! ते ब्राह्मण मी शूद्र —

धुरंधर : त्रिवेणी, तूं शूद्र आहेस हें अनुमान काढतांना तूं जरा घाई केलीस आणि शूद्री व ब्राह्मण ह्यांच्या अनुलोम विवाहास शास्त्राज्ञा प्रतिकूल नाहीं.



धुरंधर : त्रिवेणी, डोळे उघड आणि माझ्याकडे पाहा.

त्रिवेणी : शास्त्राज्ञा नसली तरी रूढी आहे ना प्रतिकूल ?

धुरंधर : त्रिवेणी, ज्या रूढीनें अनुलोम विवाह बंद करून जातीजातींमधलें सख्य नाहींसें केलें, त्या रूढीला झुगारून देऊन तुझा वल्लभ तुझ्याशीं विवाह करण्याला तयार आहे. मात्र, तूं पुन्हा आत्महत्या करणार नाहींस, अशी शपथ घे.

त्रिवेणी : पुन्हा आत्मघाताचा प्रयत्न मी करणार नाहीं, असें मी कबूल करतें.

धुरंधर : अरे, हें काय ? डोक्यावरून सारखें रक्त वाहात आहे. विहिरींत दगड लागून डोक्याला खोंक पडलेली दिसते. ह्या गोष्टीचा कोणास संशय येऊं नये अशी तजवीज केली पाहिजे. तुझी खोंक केंसांच्या आच्छादनाखालीं झांकलेली असल्यामुळें ती कोणाला दिसणार नाहींच.



# जिव हा तोषका...

शनिवारीं रात्रीं मसणवटींत जोशीबुवा आणि भार्गव आले होते, अशी बातमी कोतवालानें (श्रीपतीनें दिलेल्या माहितीवरून) प्रयागपंडितांना सांगितली. तेव्हां ह्यांपैकीं एखाद्याकडे ताइताची मुलगी सापडेल, असा कयास सांगून त्यांनीं तिकडे शोध घेण्यास त्याला फर्मावलें. त्याप्रमाणें तो श्रीपतीसह विश्वेश्वरशास्त्र्यांच्या घरीं आला असतां जोशीबुवांसह सर्व मंडळी शास्त्रीबुवांच्या दूर असलेल्या आरामबागेंत गेल्यामुळें, तिथें फक्त म्हाळसाच त्यांच्या दृष्टीस पडली. म्हाळसा ही श्रीपतीची गांवची मैत्रिण, शास्त्रीबुवांच्या घरची मोलकरीण. यमुनेनें तिची भलतीच समजूत करून देऊन त्रिवेणीच्या गळ्यांतील जस्ती ताईत तिच्या गळ्यांत बांधला होता. त्यावरून म्हाळसा ही आपलीच लहानपणीं टाकलेली मुलगी, असें खंडेराव कोतवालानें शास्त्रीबुवांना सांगून तिला घेऊन जावयाचा विचार त्यांना

कळविला. ताइताची मुलगी विश्वेश्वरशास्त्र्यांच्या घरीं असल्याची बातमी भार्गवलाही लागून तिची भेट घ्यायला तोही तेथें आला; पण ताईंत कुणबी म्हाळसेच्या गळ्यांत पाहून त्यालाही सखेद आश्चर्य वाटलें. परंतु आपल्या ह्या बहिणीला, स्नेहाच्या जोरावर, धुरंधर महाराजांची राणी करायचीच असा त्यानें दृढ निश्चय केला.

धुरंधराचा भाचा पार्थिव हा शहराच्या बंदोबस्ताचा अंमलदार असून, अविवाहितच होता. त्याला गंगू व यमुना ह्या दोघींनींही झिडकारलें होतें. तोही 'राजकुलीन' असल्यामुळें त्यानेंही 'वेताळाच्या जाहिराती'चा फायदा घेण्याचें ठरविलें. शनिवारीं रात्रीं जोशी आणि भार्गव हे दोघेही स्मशानांत आले असल्याची बातमी खंडेराव कोतवालाकडून त्याला कळल्यामुळें, ती 'ठेव' ह्या दोघांपैकीं एकाजवळ असली पाहिजे, असा तर्क करून, ती हस्तगत करायला तो शास्त्रीबुवांच्या वाड्यांत आला. त्याआधीं धुरंधरासह सर्व मंडळी आरामबागेंत गेल्यामुळें पार्थिवाचा सहजच प्रवेश होऊन जोशीबुवांची पेटी त्यानें फोडली. तींत, उंची वस्त्रें, मोत्यांचे हार वगैरे अलंकार त्याला दिसले. त्यांवर हक्क आपलाच, हें त्यानें गृहीत धरलें! वस्त्रें, अलंकार धुरंधराचे, हें पार्थिवानें ओळखलें. तों पेटीपासून दूरपर्यंत ( त्रिवेणीच्या खोकेंतील ) रक्ताच्या थेंबांची रांग लागलेली त्याला दिसली. तीवरून, 'जाहिराती'नें आकर्षून शहरांत आणलेल्या धुरंधराचा ज्योतिषीरूपी तोतयानें हा खून केला असला पाहिजे, अशी मनाशीं गांठ घालून, खुनी जोशीबुवाला पकडून न्यायालयासमोर खेंचण्याचा त्यानें हिरीरीनें निश्चय केला.

खंडेराव कोतवाल म्हाळसेला घेऊन प्रयागपंडितांकडे आला. परंतु तिचें हेंगाडी बोलीभाषण, निकृष्ट अभिरुचि, अविश्वासी

कृतघ्नपणा आणि विशेषतः तिच्या गळ्यांतील रिकामा ताईत, ह्यांवरून ती आपली मुलगी नसावी, अशी प्रयागपंडितांची खात्री झाली. तोंच धुरंधर महाराजांचा खून जोशीबुवांनीं केल्याची बातमी घेऊन पार्थिव आला आणि त्याला पकडण्याचा हुकूम प्रयागपंडितांजवळ मागूं लागला आणि तो त्याला मिळालाही.

घरांत लहानाची मोठी झालेली त्रिवेणी शेवटीं 'शूद्र' ठरलेली पाहून शास्त्रीबुवांची बायको वाराणशी हिनें जोशीबुवांजवळ तिच्या निंदेचें नुसतें तारांगण केलें. परंतु अनुरक्त जोशीबुवांकडून त्याला कांहींच साथ न मिळतां उलट त्रिवेणीचें समर्थनच त्यांनीं केल्यामुळें ती बया संतापानें निघून गेली. त्या वेळीं धुरंधर त्रिवेणीचें सांत्वन करूं लागला —

धुरंधर : त्रिवेणी, ह्या कैदाशिणीनें तुझ्या संबंधानें केलेलें तारांगण ऐकलें म्हणजे असें वाटूं लागतें, कीं स्वतःला आलेला संशय तिला सांगितलास, ही तूं चूकच केलीस !

त्रिवेणी : माझा संशय जर त्यांना कळविला नसता, तर त्यांच्याशीं विश्वासघात केल्यासारखें नसतें का झालें ?

धुरंधर : तूं आपल्या धर्मानें वागायला गेलीस खरी, पण त्याची तिला काय किंमत ! खरोखर ब्राह्मणजातीचे असे मासले पाहिले, म्हणजे शूद्र ही सन्मानाची पदवी वाटूं लागते ! पावित्र्य, भूतदया, औदार्य ह्या गुणांमुळें जर ब्राह्मण्य ठरवायचें असेल, तर तूं अतिश्रेष्ठ ब्राह्मण ठरशील.

ब्राह्मण्य सारें । रमलें तुझे ठायिं । धरुनी मधुर रूप ।
अतितोषदायि ॥ धृ० ॥
ज्ञानार्कतेजा शमचंद्रिकाही ।
सह नांदवाया । धरिसी स्वदेहीं ॥
सत्यासिधाराव्रत तेंवि पाहीं ।
मृदुहृदयनवनीत । तव मूर्ति वाही ॥

ह्या गुणांचा गंधही नसलेली ती वाराणशी अत्यंत कनिष्ठ शूद्र ठरेल. तूं शूद्र म्हणवूं लागल्यापासून मलाही शूद्र व्हावस वाटूं लागलें आहे. त्रिवेणी, कृपा कर आणि मला दीक्षा देऊन आपल्या वर्णांत प्रविष्ट कर.

त्रिवेणी : महाराज, आपण उदारपणें ज्या गोष्टीची सूचना करीत आहां ती गोष्ट आपल्या हातून घडल्यास आपणांवर समाजाकडून केवढें संकट येईल, ह्याची आपणांस कल्पना तरी आहे का ? सारें जग आपणांला दूर करील.

धुरंधर : माझ्या त्रिवेणीनें मला जवळ केल्यावर जगानें दूर केल्याची मला काय पर्वा वाटणार आहे ? लोकांनीं मजवर जरी आगीचा वर्षाव केला, तरी तो तुझ्या स्पर्शामुळें शीतलच वाटेल. त्यांनीं माझ्यावर घाणेरड्या कर्दमाची वृष्टि केली, तरी तुझ्या सुगंधी श्वासामुळें ती मला चंदनाच्या उटीप्रमाणेंच भासेल.

त्रिवेणी : अहाहा ! महाराज, हें ऐकून माझी जी स्थिति झाली आहे तिचें कोणत्या शब्दांनीं वर्णन करूं ?

जिव हा तोषला । परिसुनि सुधोपमा बोला ॥ धृ० ॥
धन्य मी लोकिं बाला । सुदिन उदेला ।
हर्षें हा आत्मा न्हाला । पुलकें देह हा दाटला ।
मन भ्रांतचि हो या काला ॥

२९-८-०८
बालवाङ्मय
६२२
७५१२४

पण महाराज, एकदां समाजाकडून छळ सुरू झाला, म्हणजे तो आपणांवर ओढून आणणाऱ्या स्त्रीचा आपणांला तिटकारा मात्र येईल.

धुरंधर : तसाच अनुभव आला, तर मी समाजावर बहिष्कार घालून अरण्यांत राहीन.

त्या सदा वनवास । सुखनिवास । तव सहवास जयास ॥ धृ० ॥
नलगे संग समाजाचा जो । दंभनाथ रूढिदास ॥

त्रिवेणी, करणार ना मला तूं जवळ ? अंतःकरणांनीं आपण आधींच एक आहोंत. अहाहा ! त्रिवेणी, तूं मला धन्य केलेंस, आतां समाज मला दूर करील तर खुशाल करूं दे !

तोंच जोशीबुवांना पकडण्याचा हुकूम घेऊन पार्थिव, कोतवाल व श्रीपति तेथें आले आणि धुरंधरला पार्थिवनें हुकूम दाखविला.



तोंच जोशीबुवांना पकडण्याचा हुकूम घेऊन पार्थिव, कोतवाल व श्रीपति तेथें आले.

प्रसंग आला असतांही त्रिवेणीची प्रीति आणि विश्वास ह्यांची कसोटी लावण्याची ही उत्तम संधि आहे असें पाहून, धुरंधरनेंही आपली खरी ओळख त्या वेळीं दिली नाहीं आणि तो त्यांच्या स्वाधीन झाला. तत्क्षणीं त्रिवेणीही शोकानें मूर्च्छित पडली.



# नृप न दे मन ह्यों...

आपला प्रिय वल्लभ ज्योतिषीरूपी धुरंधर ह्याच्यावरील खुद्द राजेसाहेबांच्या खुनाच्या आरोपाचा खटला न्यायाधीश प्रयागपंडित ह्यांच्यासमोर चालायचा आहे हें कळल्यावर निष्पाप, निरपराध जोशीबुवासंबंधानें रदबदली करायला त्रिवेणी पंडितमहाशयांच्या वाड्यांत आली. तिला पाहातांच, कांहीं अज्ञात प्रभावामुळें प्रयागपंडितांचें मन वात्सल्यानें चलबिचल झालें. निर्मल आणि पापभीरु जोशीबुवांच्या हातून खुनासारखा — त्यांतून राजघातासारखा — गुन्हा होऊं शकणार नाहीं अशा आशयाचा पंडितांसमोर त्रिवेणीनें पुष्कळ युक्तिवाद केला आणि त्यांच्या प्राणांविषयीं करुणाही भाकली.

**त्रिवेणी :** ते माझे जीवितेश्वर आहेत. माझ्यासारख्या अनाथ मुलीचा ज्यांनीं परामर्श घेतला, ते आपल्या राजाचा कसा हो घात करतील ? तुम्हीच सांगा —

**प्रयाग० :** काय म्हणतेस ? राजाचा वध केल्याचा आरोप ज्याच्यावर आहे, तोच का हा ज्योतिषी ?

त्रिवेणी : होय तेच.

प्रयाग० : तर मग मुली, मला तुझी अत्यंत दया येते.

त्रिवेणी : महाराज, मला पाहिजे तर कडक शासन करा, पण त्यांना वांचवा. तुमच्या हातून निरपराध्याला शासन व्हायचं असेल, तर मला शासन करा. निर्दोषीपणांत ते आणि मी सारखींच आहोंत.

प्रयाग० : राजा म्हणजे प्रजेचा पिता! त्याचा वध करणारा खुद्द माझा जन्मदाता असता तरीही त्याला मरणाची शिक्षा सुनावणें माझं कर्तव्य होतें.

त्रिवेणी : तुम्हांला स्वतःची एखादी मुलगी असेल. तिच्या पतीवर असें संकट आलें असतें तर तुम्हीं काय केलें असतें ह्याचा विचार करा. तिला वैधव्याची शिक्षा देण्याला तुमची जीभ खास धजली नसती! तुम्हांला मुलगी नसेल, तर घटकाभर मीच तुमची मुलगी आहें अशी कल्पना करा आणि मला चुडेदान द्या.

प्रयाग० : मुली, तुझें काकुळतीचें भाषण माझ्या हृदयाला घरे पाडीत आहे. तुझ्या चेहेऱ्यावरून, तुझ्या आवाजावरून, तुझ्या ढबीवरून मला फार वर्षांपूर्वीच्या माझ्या एका प्रियकर माणसाची आठवण होत आहे. मी तुला इतकंच आश्वासन देतों, कीं तुझा वल्लभ निर्दोष आहे, अशाच भावनेनें मी त्याच्याविरुद्ध येणाऱ्या पुराव्याकडे पाहीन.

ह्यापलीकडे तो न्यायनिष्ठुर अधिकारी, त्रिवेणीची दया येऊनही विचलित झाला नाहीं आणि त्याच्या वर्तनाचा भलताच अर्थ करून ती अत्यंत निराशेनें व क्षोभानें निघून गेली. जातांना तिनें न्यायाधीशमहाराजांना बजावलें —

ही विमलशील ललना। कुलीना। चलितमति न कल्पांति कधिं होइ। कितीहि मोह भय पुढें दिसेना॥ ध्रु० ॥ दुष्ट हेतु हृदयीं जो धरिला। विफल केवल न घातक अपणा॥

आपल्या ‘ बहिणी ’ चा विवाह महाराजांशीं जमविण्याच्या हेतूनें म्हाळसेला घेऊन भार्गव धुरंधरला ठेवलेल्या तुरुंगांत आला आणि

तिच्याशीं लग्न करण्याला त्यानें मान्यता द्यावी म्हणून, आपल्या मैत्रीच्या जोरावर, त्याचें मन वळविण्याचा त्यानें निकराचा प्रयत्न केला. पण त्याचे सर्व मुद्दे धुरंधरनें साफ खोडून काढले. तोंच म्हाळसा–श्रीपतीच्या वशिल्यानें त्रिवेणी तेथें येऊन ठेपली. त्यावरून धुरंधराची वल्लभा हीच, असें अनुमान काढून भार्गव बहिणीसह निघून गेला.

**धुरंधर :** कोण त्रिवणी ! प्रिय, तूं आपला जीव माझ्याकरितां संकटांत कशाला घातलास ?

**त्रिवेणी :** आपण मजकरितां साऱ्या समाजाचा रोष आपणावर ओढून घेण्याला तयार झालांत. मी केवळ अधिकाऱ्यांचा रोष ओढून घेण्याला धजलें, ह्यांत अधिक तें काय केलें ?

**धुरंधर :** म्हणजे तुझें म्हणणें तरी काय ?

**त्रिवेणी :** मी हा बुरखा आणला आहे. हा अंगावर घेऊन आपण बाहेर पडावें.

**धुरंधर :** आणि तूं माझ्या जागीं बसणार, होय ? तुझ्या प्राणांनीं मी आपले प्राण विकत घेऊं म्हणतेस ? त्रिवेणी, इतका नीच अजून मी झालों नाहीं. ते यमदूत तुझे हाल हाल करून मजवरचा सूड तुजवर उगवतील. मृत्यु पुरवला, पण ह्या यातना नकोत, असें तुला होऊन जाईल.

**त्रिवेणी :** पण आपले प्राण तर वांचतील ना ? आपण माझे पंचप्राण, जिवाचे कलिजे ! आपण सुखरूप असलांत, म्हणजे मीही सुखरूप असल्या-सारखीच आहे. उलटपक्षीं आपल्या जिवाचें कांहीं बरेंवाईट झालें, तर मी जिवंत असूनही मेल्यासारखीच आहें !

आपणाविना ही काया । स्नेहशून्य जणुं ज्योति मुळिं वाया ॥ ध्रु० ॥
कुंकुमाविणें कपाळ । गमत जना नच मंगल । गतजीवन नवमृणाल । होत विकल ॥

**धुरंधर :** त्रिवेणी, आतां खरी गोष्ट तुला सांगायला हरकत नाहीं. मीं आतांपर्यंत तुझ्या निर्मळ प्रेमाची परीक्षा पाहाण्याकरितां हें सारं सोंग केलं होतं, त्याची



धुरंधर : त्रिवेणी, आतां खरी गोष्ट तुला सांगायला हरकत नाहीं.

क्षमा कर. प्रिये, मी ज्योतिषी नाहीं. ज्याचा खून केल्याचा मजवर आरोप आहे, तोच मी धुरंधर !

त्रिवेणी : ( एकीकडे ) विपत्तीमुळें ह्यांचें मस्तक फिरलें कीं काय ? ( उघड ) महाराज, कृपा करा आणि आपलें मस्तक शांत करा. कोणीं ऐकलें तर आपणांला उन्मादवायूच झाला कीं काय, असें त्याला वाटेल.

धुरंधर : मी दुसऱ्या कोणाचीही पर्वा करीत नाहीं. पण त्रिवेणी, तुलाही असें वाटतें का ?

त्रिवेणी : आपलें धैर्य मेरुपर्वताप्रमाणें अचल आहे. महाराज, आपण हा विनोद करीत आहां ! महाराज, आपण राजापेक्षाही श्रेष्ठ आहां !

धुरंधर : मग माझ्या बोलण्यावर तुझा विश्वास कां नसावा ?

त्रिवणी : अजूनही तुम्ही आपलें म्हणणें सोडीत नाहीं ना ?

धुरंधर : मी तोतया आहें, हा लोकांचा समज खरा ठरावा म्हणून मी असंमजसपणें आपल्या हक्काच्या कुळावर व नांवावर पाणी सोडूं ? माझ्या जन्मसिद्ध हक्कांवर पाणी सोडूं ?

त्रिवेणी : महाराज, आपण असं बोलूं लागलांत, कीं आपण तोतये आहांत हा लोकांचा समज दृढ नाहीं का होणार ?

धुरंधर : पुन्हा लोकांचं नांवही नको मला ऐकायला ! मी लोकांचा शास्ता आहें. लोक माझे शास्ते नाहींत.

> जननियंता अहंता । सोडुनी वाहि शिरिं ।
> परनियंत्रणधुरा हो न ऐसें ॥
> आकाश कोसळो । भूगोल डळमळो ।
> नृप न दे मन ढळों । इतर जैसें ॥

त्यानें तिच्या प्रस्तावाला अर्थातच मान्यता दिली नाहीं. ह्या प्रसंगीं, आपण तोतया नसून खरोखरच धुरंधर असल्याबद्दल त्रिवेणीची खात्री करण्याचा त्यानें प्रयत्न केला. तिच्या निर्मल प्रेमाची कसोटी पाहाण्यासाठीं आपण छद्मवेषानें राहिलों होतों, असेंही

त्यानें तिला सांगितलें. परंतु आपला वल्लभ खरोखरीच ज्योतिषी असून विपत्तीमुळें भ्रान्तपणें असें बोलत आहे, असें तिला वाटलें. शेवटीं मनाशीं कांहीं निश्चय करून त्रिवेणी निराशेनें तेथून निघून गेली.

धुरंधर वल्लभेच्या प्रेमानें स्तंभित होऊन स्वतःशीं उद्गारला —

धुरंधर:

**प्रेमा तिच्या उपमा नोहे । भूमीमाजी हेमाविना ॥ धृ० ॥**
**तें प्रेम अधिक चमके संकटिं । अग्नित हेमहि तपतांना ॥**



# प्रेम देई आणि शौर्यातें...

धुरंधरमहाराजांचा 'खून' झाला तेव्हां त्यांचा भाचा पार्थिव ह्याच्याकडे राज्याधिकार आल्यामुळें, आपल्या वल्लभाच्या निरपराधित्वाची खात्री पटवून त्याला मुक्त करण्याची विनंति करण्याकरितां त्रिवेणी त्याच्याकडे आली. परंतु, तिच्या 'अचल' प्रेमाची भरपूर स्तुति करून, ती तें प्रेम आपणाला अर्पण करायला तयार असेल तर तिची विनंति मान्य करायला तो लंपट माणूस सिद्ध झाला! ती अर्थातच त्रिवेणीनें आवेगानें नाकारली. तेव्हां तिच्या प्रियकराबरोबर तिचेही अतिशय हाल करण्याची धमकी देऊन पार्थिव निघून गेला.

महाराजांचा खून करण्यांत भार्गवानें जोशीबुवांना भरपूर साहाय्य केलें असा 'पुरावा' शोधून काढून पार्थिव, कोतवाल वगैरे अधिकाऱ्यांनीं भार्गवला कैद केलें. प्रत्यक्ष खटल्यांत तो सरकारतर्फे माफीचा साक्षीदार झाला. असें करण्यांत भार्गवचा गुप्त हेतु होता.

आपल्या गुप्त बहिणीशीं लग्न करण्यासाठीं धुरंधरचें मन वळविण्याचा त्यानें पुन्हा एकवार निकराचा प्रयत्न केला. त्या वेळीं —

भार्गव : आपणांला तिच्यांत काय गुण दिसले असतील ते खरे ! मला तर तिच्यांत विशेष असें कांहीं दिसत नाहीं.

धुरंधर : ह्या आपल्या चौकशींतच तिच्या निर्मळ प्रीतीचें असें बळवत्तर प्रत्यंतर दिसून येईल, कीं त्यानें तुझ्यासारख्या दुराग्रही मनुष्याचा दुष्ट ग्रहसुद्धां पालटून जाईल.

भार्गव : असें बडें प्रत्यंतर तें काय दिसणार आहे बुवा !

धुरंधर : फार काय, पण प्रसंग पडला, तर ती मजकरितां प्राण देण्याला सुद्धा तयार होईल !

वाहि बालिका मना । ज्या तदर्थ जो सुखेंहि त्यजिते स्वप्राणा ॥ धृ० ॥
प्रेम देइ अंगीं धैर्यातें । भय नेई विलयातें । शिकवी असुदाना ॥

भार्गव : प्राण देण्याच्या गोष्टी तर राहूंच द्या ; तिनें ह्यापुढें आपणांला तोंड दाखविलें म्हणजे मिळविली !

धुरंधर : हा तुझा भ्रम आहे. ती माझ्या जिवाला जीव खात्रीनें देईल.

भार्गव : आणि न दिला तर ?

धुरंधर : तूं काय म्हणशील तें ऐकेन. फार काय, पण त्या तुझ्या गांवढळ व मूर्ख कुणबाऊ बहिणीशीं जन्माची गांठ बांधून घ्यायला सांगितलेंस तरी मी तें पत्करीन.

भार्गव : कबूल ; हें पक्कें ना ?

धुरंधर : अगदीं निर्वाणीचें ! ( एकीकडे ) ह्या पणांत हरण्याची मला तर भीतीच नाहीं.

भार्गव : ( एकीकडे ) माझ्या ताईसाठीं मला ही पैज जिंकलीच पाहिजे आणि त्याकरितां त्रिवेणीसारख्या कच्च्या पोरीची मति कुंठित होईल, असें उग्र स्वरूप ह्या खटल्यास मला दिलं पाहिजे.

पाड काय बालबुद्धि चंचलशा मुलीचा ॥ धृ० ॥
कधिं देखियली नच न्यायसभा निजडोळ्यां । कीं संमर्द जनांचा ॥
बावरेल घाबरेल तन्मति पाहुनि थाट सभेचा । लाभ नृपातें मग कैंचा ॥

तोंच पार्थिव वगैरे अधिकाऱ्यांनीं त्याला पकडलें. तेव्हां तो स्वतःशीं म्हणाला —

**भार्गव :** ( स्वतःशीं ) हें काय मध्येंच विघ्न उपस्थित झालें? पण झालें हें एकपरी ठीक झालें. कारण आतां मला सरकारतर्फे माफीचा साक्षीदार होऊन महाराजांवरील आरोप दृढ करण्याची आयतीच संधि मिळणार!

शेवटीं, सरन्यायाधीश प्रयागपंडित ह्यांच्यासमोर महाराजांच्या खुनाचा खटला सुरू झाला. त्यांत भार्गवची साक्ष झाली. धुरंधर खऱ्या स्वरूपांत प्रकट होतांच, त्याच्यावरील सर्व आरोप धुळीस मिळतील ह्या खात्रीनें, त्यानें खुनाची साद्यन्त माहिती बनावट तयार करून खुशाल सांगितली! धुरंधरला भार्गवला साक्ष देतांना पाहून आश्चर्य वाटलें. पण हा 'सूड असावा अशी त्याची कल्पना झाली. इतर संबंधीयांच्या अगोदर झालेल्या साक्षींनीं, जोशीबुवांनींच महाराजांचा खून मोठ्या कौशल्यानें केल्याच्या आरोपाला चांगलीच मदत होत असल्याचा न्यायाधीशांनीं आरोपीला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. धुरंधर आपला बचाव करतांना म्हणाला —

**धुरंधर :** पंडितमहाराज, ह्या विलक्षण खटल्यांत फिर्यादी सरकार, आरोपी सरकार व खून झालेला इसमही सरकारच, असा मोठा चमत्कारिक योग जुळून आला आहे. मी माझा स्वतःचाच खून करून स्वतःवरच त्या खुनाचा आरोप करीत आहें, असा अपूर्व प्रसंग मजवर आला आहे! पंडितमहाराज, ज्या गोष्टी मीं कांहीं अंतस्थ कारणाकरितां बाह्यात्कारीं धारण केल्या होत्या, त्या आपण माझ्या स्वतःच्या म्हणून गृहीत धरतां, आणि ज्या गोष्टी माझ्या स्वतःच्या आहेत, त्या मीं बतावणी करण्याकरितां पुढें केल्या आहेत, असें आपण समजतां; ह्यामुळें ह्या खटल्याला हें गंभीर स्वरूप आलें आहे.

**प्रयाग० :** जोशीबुवा, तुम्हीं रचलेली ही हकीगत फार चातुर्यानें रचली आहे, ह्यांत शंका नाहीं. परंतु जोंपर्यंत आपणांस त्या अंतस्थ कारणांचा उलगडा

करतां येत नाहीं, तोंपर्यंत त्या कारणांची सबब केवळ सर्व गोष्टींची संगति लावण्याच्या असमर्थतेमुळें पुढें केली आहे असेंच कोणासही वाटणार आहे.

धुरंधर : तीं कारणें मला न्यायासनासमोर मांडतां येत नाहींत, ह्याला माझा निरुपाय आहे. तीं गुप्त ठेवण्याबद्दल मला मरण आलें तरी त्याला माझी तयारी आहे.

शेवटीं पुराव्याकरितां धुरंधरनें खुद्द आईसाहेबांचीच साक्ष काढण्यासाठीं न्यायाधीशांना विनंति केली. परंतु राणीसाहेबांचा उपमर्द करण्याकरितांच आरोपीची ही युक्ति आहे असें मानून त्यांनीं ती अमान्य केली. इतक्यांत त्रिवेणी जोशीबुवांच्या वतीनें साक्ष देण्याकरितां आपण होऊन आवेगानें पुढें आली. तिच्या साक्षीच्या प्रश्नोत्तरांत, तिची पूर्वपीठिका, गळ्यांतला जस्ती ताईत, वगैरे गोष्टी निघून त्रिवेणी ही आपलीच त्याग केलेली मुलगी, ह्याविषयीं प्रयाग-पंडितांना शंका राहिली नाहीं. इतक्या वर्षांनीं अवचितपणें शोध लागलेल्या आपल्या मुलीच्या वल्लभाला मृत्यूची शिक्षा फर्मावण्याचा आपणांवर प्रसंग यावा, ह्याचें त्यांना अत्यंत दुःख झालें. जोशीबुवांनीं खून केला नसून आपणच तो केला, असें त्रिवेणीनें साफ सांगितलें. केवळ आपणाला वांचविण्याकरितां खुनाचा आरोप स्वतःवर ओढून घ्यायला त्रिवेणी सिद्ध झाली, हा तिचा अपूर्व, उदात्त स्वार्थत्याग पाहून धुरंधर आश्चर्यानें आणि कृतज्ञतेनें स्तिमितच होऊन गेला.

तोंच खुद्द राणीसाहेबच न्यायालयांत येऊन दाखल झाल्याची वर्दी आली. भार्गवनेंच त्यांना ताबडतोब निघून येण्याबद्दल लिहून कळविलें होतें. त्यांच्या आगमनानें घोर संकटाचें वातावरणच पार बदलून वस्तुस्थिति यथार्थतेनें प्रकट झाली.



धुरंधर : आईसाहेब, होय, मीच तो.

**भार्गव :** ( एकीकडे ) माझा जीव खालीं पडला. मी राणीसाहेबांना तावडतोब निघून येण्याबद्दल पत्र लिहिलें, म्हणून बरें झालें. नाहीं तर आज मोठाच प्रसंग गुदरायचा !

( प्रयागपंडित सामोरा जातो. राणी प्रवेश करते. )

**राणी :** पार्थिवराज, तुमच्याकडून परवां जें पत्र आलें, त्याचा मला अर्थच कळेना. काल भार्गवकडून तावडतोब निघून येण्याबद्दल दुसरें पत्र आलें. त्याप्रमाणें, ही सारी भानगड काय आहे हें प्रत्यक्ष पाहाण्याकरितां मी इथें आलें आहें. हा खटला कसला चालला आहे ?

**प्रयाग० :** आईसाहेब, आज आपणांला अत्यंत अप्रिय अशी वार्ता सांगण्याचा मजवर प्रसंग आला आहे. ह्या दुर्दैवी पुरुषानें सर्व प्रजाजनांना शोकसमुद्रांत लोटलं आहे.

**राणी :** कोण ? बाळासाहेब ?

**धुरंधर :** आईसाहेब, होय, मीच तो. ( दोघें भेटतात )

**राणी :** तुमच्यावर आरोप ? आणि तो आणण्याचें धारिष्ट कोणाला झालें ?

**प्रयाग० :** राणीसाहेब, हे धुरंधरमहाराज नसून हा तो तोतया आहे.

**राणी :** पंडित, तोतया म्हणजे कोणी खरीखुरी व्यक्ति नसून काल्पनिक आहे. त्याला आम्हींच आमच्या कल्पनेनें उभं केलं होतं. पण ज्याप्रमाणें पिशाच काल्पनिक असलं, तरी बाधा केल्यावांचून राहात नाहीं, त्याप्रमाणें ह्या काल्पनिक तोतयानें शेवटीं आपला हात आम्हांला दाखविलाच !

**प्रयाग० :** महाराज, मजकडून मोठा प्रमाद घडला त्याची क्षमा तरी कोणत्या तोंडानें मागूं ?

**धुरंधर :** पंडित, ह्यांत आपणाकडे किंवा दुसऱ्या कोणाकडे कांहीं दोष येत नाहीं. सर्व प्रकार केवळ गैरसमजुतीनें झाला.

सर्व संकटें दूर होऊन सर्वांनाच आनंदीआनंद झाला. त्रिवेणीसारख्या अनुरूपगुण वधूची यथार्थ गुणपरीक्षा होऊन ती धुरंधराची आणि राज्याची स्वामिनी झाली आणि भार्गव, पार्थिव व श्रीपति ह्यांना यमुना, गंगू व म्हाळसा ह्यांचाही त्यांच्या त्यांच्या इच्छेप्रमाणें लाभ होऊन कथानकाची मधुर समाप्ति झाली !

# वधूपरीक्षा
# आणि
# पुस्तकपरीक्षा

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. ६२६९ नों. दि.
वि. ५१.९८ क्र.

* * * * * * * * * * * * * * *

IRBK-0106269

ह्या दोन्ही परीक्षा सारख्याच अवघड

IRBK-0106269

तर खऱ्याच. आणि पुस्तकांचे परीक्षक कोण ?
तर तुमच्यासारखे चोखंदळ बालवाचक.

पण आमचीं सगळींच पुस्तकें
तुम्हीं घेतलेल्या परीक्षेंत "पास" झालीं.
"पास" झालीं म्हणजे काय तुम्हांला
अगदीं मनापासून आवडलीं.

अनुक्रम २९७७
विभाग बालसाहित्य
क्रमांक ७६८
नों. दि. १९।२।५

"नाटकांच्या गोष्टीं" वर जसे तुम्ही
अगदीं खूष आहांत तसेच आमच्या
इतर "गोष्टीं" वरही बेहद्द खूष व्हाल
मग ह्या "गोष्टीं"ची यादीच मागवा ना.

## केशव भिकाजी ढवळे

कर्नाटक हाउस, गिरगांव, मुंबई २